NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## विद्यापरिषदेच्या ५१ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## सोमवार, दि.०३ ऑक्टोंबर, २०२२ दुपारी १२:०० वा.



**विद्यापरिषदेची ५१ वी तातडीची बैठक सोमवार, दि.०३ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता** मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ. क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | प्रा. डॉ. वि. बा. पाटील - प्रभारी प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. शं. द. नवले - प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील - प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ५) | डॉ. वि. पां. शिखरे - प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| ६) | डॉ. सि. ना. सलवदे - प्र. सहयोगी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ७) | डॉ. स. श्या. लड्डा - संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. शि. सु. गणपूर - संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य |
| ९) | योगिनी घारे, कुलसचिव तथा सदस्य - सचिव | सदस्य-सचिव |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले. तसेच नव्याने नियुक्त झालेल्या श्रीमती योगिनी घारे, कुलसचिव यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा.कुलगुरु महोदया यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

**अभिनंदन :**

विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या निवडणुका वेळेत व निपक्ष:पातीपणे पूर्ण करुन राज्यामध्ये दुसरा क्रमांक मिळविल्याबद्दल मा.कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव व निवडणुक विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करण्यात आले.

**अनुपस्थिती :**

विद्यापरिषदेच्या या बैठकीस प्राचार्य डॉ. चं. श्री. सुर्यवंशी - प्रभारी सहयोगी अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, डॉ. ध. रा. माने, मा. शिक्षण संचालक (उ.शि.), महाराष्ट्र राज्य, पुणे व डॉ. द. व्यं. जाधव, मा. विभागीय सहसंचालनालय, (तं.शि.), पुणे हे विद्यापरिषदेच्या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ] दि.२८ जुलै, २०२२ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

टिपणी : कुलसचिव यांनी दि.२८ जुलै, २०२२ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव: | दि.२८ जुलै, २०२२ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त सर्वानुमते वाचून कायम करण्यात आले. |

[ ०२ ] **प्रस्तुत विद्यापीठ परिसर जैवविज्ञान संकुलात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून B.Sc. Biological Sciences हा अभ्यासक्रम ४० प्रवेश क्षमतेसह व M.Sc. Bioinformatics पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह नव्याने सुरु करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३(१) (च) मध्ये पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरु करण्यासंबंधी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्याची तरतूद नमूद आहे.

त्याअनुषंगाने प्र.संचालक, जैवविज्ञान संकुल, पुअहोसोविसो यांनी दि.१४/०७/२०२२ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणी सोबत मा. कुलगुरु महोदयांची दि.१३/०७/२०२२ रोजीची मान्यता टिपणीन्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता रोजगारभिमूख नवीन अभ्यासक्रम सुरु करणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तद्नुषंगिक तरतूदीनुसार विद्यापीठाचे कर्तव्य आहे, तसेच केंद्र शासनाचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शी अनुरुप नवीन अभ्यासक्रम सुरु करणे आणि या भागाचा विकास करणे आवश्यक आहे.

तरी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून जैवविज्ञान संकुलात B.Sc. Biological Sciences - ४० प्रवेश क्षमतेसह व M.Sc. Bioinformatics - २० प्रवेश क्षमतेसह नवीन अभ्यासक्रम (New Program) सुरु करण्यास, सदरचा विषय विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेस ठेवण्याकरिता सादरीकरण केले असता, नजीकच्या काळात विद्यापरिषदेची प्रायोजित बैठक नसल्याने, सदरचे विषय प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता, तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी दि.१६/०७/२०२२ रोजीच्या सादरीकरणावर विद्यापरिषदेच्यावतीने १२(७) खाली मान्यता प्रदान केली आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसर जैवविज्ञान संकुलात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून B.Sc. Biological Sciences हा अभ्यासक्रम ४० प्रवेश क्षमतेसह व M.Sc. Bioinformatics हा पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह नव्याने सुरु करण्यास, मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये विद्यापरिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर जैवविज्ञान संकुलात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून B.Sc. Biological Sciences हा अभ्यासक्रम ४० प्रवेश क्षमतेसह व M.Sc. Bioinformatics हा पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह नव्याने सुरु करण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**[ ०३ ] स्वायत्त महाविद्यालयातून प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक संकुलांमध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षापासून प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश, पात्रता संबंधित अधिष्ठाता मंडळांनी शिफारस केलेल्या नियमावलीस, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदया यांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.**

टिपणी: स्वायत्त महाविद्यालयातून प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक संकुलात सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या द्वितीय व तृतीय वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश, पात्रता व निकालाबाबतची नियमावली तयार करण्याचा विषय दि.११/०४/२०२२ रोजीच्या मा.अधिष्ठाता मंडळ बैठकीसमोर सादर करण्यात आला होता.

या बैठकीस मा.अधिष्ठाता मंडळाने ठराव क्र. २१(११) अन्वये प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित स्वायत्त महाविद्यालयातून इतर संलग्नित महाविद्यालयात द्वितीय व तृतीय वर्षास प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश, पात्रता व परीक्षेच्या निकालासंदर्भात नियमावली तयार करण्याकरीता अभ्यास समिती गठीत करुन, नियमावली व शिफाररशीसह सदरचा विषय पुढील बैठकीत सविस्तर फेरसादर करावा असा ठराव पारीत केला होता.

या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी मा.प्र-कुलगुरु महोदय यांनी नामनिर्देशित केल्यानुसार खालीलप्रमाणे अभ्यास समिती गठीत केलेली होती.

१) प्राचार्य डॉ. डी. एस. तिकटे

२) प्राचार्य डॉ. एस. एस. गणपूर

३) प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे

४) डॉ. व्ही. पी. शिखरे

उक्त अभ्यास समितीची बैठक दि.१४/०६/२०२२ रोजी विद्यापीठ बैठक कक्षात संपन्न झाली. अभ्यास समितीने स्वायत्त महाविद्यालयातून या विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक संकुलात सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षापासून पुढे प्रवेश घेण्यासाठी नियमावली तयार करुन मा. अधिष्ठाता मंडळाला शिफारस केलेली होती, ती सोबत जोडली आहे.

अभ्यास समितीने तयार केलेली नियमावली पुनश्च: दि.२५/०७/२०२२ रोजीच्या बैठकीत मा.अधिष्ठाता मंडळ यांच्यासमोर विचारार्थ सादर करण्यात आली असता, मा.अधिष्ठाता मंडळाने ठराव क्र.०४ अन्वये अभ्यास मंडळाने तयार केलेली नियमावली स्विकारुन त्यास मान्यता दिलेली आहे व विद्यापरिषदेस शिफारस केलेली आहे.

तथापि, विद्यापरिषदेचा कार्यकाल दि.३१/०८/२०२२ रोजी संपलेला आहे. तसेच निवडणूकीनंतर विद्यापरिषद गठीत होण्यास विलंब लागणार असल्याने, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करता, मा.अधिष्ठाता मंडळाने विद्यापरिषदेस स्वायत्त महाविद्यालयातून प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित व शैक्षणिक संकुलामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षापासून प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश, पात्रता व परीक्षा निकालांच्या संदर्भात शिफारस केलेली नियमावलीस विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदया यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मान्यता दिलेली आहे.

सबब, स्वायत्त महाविद्यालयातून प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक संकुलांमध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षापासून प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश, पात्रता व परीक्षा निकाला संबंधितच्या मा.अधिष्ठाता मंडळानी शिफारस केलेल्या नियमावलीस मा.कुलगुरु महोदया यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये विद्यापरिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | स्वायत्त महाविद्यालयातून प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक संकुलांमध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षापासून प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश, पात्रता संबंधित अधिष्ठाता मंडळांनी शिफारस केलेल्या नियमावलीस, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदया यांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**[ ०४ ] वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील बी.टेक. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग १ या अभ्यासक्रमाची वाढीव प्रवेशक्षमता ६० (६०+६०=१२०) च्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनिमय, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

टिपणी: वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी.टेक. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग १ या अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेचा (६०+६०=१२०) प्रस्ताव विलंब शुल्कासह सादर केला असून, त्यास ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांचे पत्र क्र. Western/१-१०९७५८७०००३/२०२२/EOA, दि.०३/०७/२०२२ व महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. मान्यता-२०२२/प्र.क्र.१४७/तांशि-४, दि.१८/०८/२०२२ अन्वये मान्यता मिळाली आहे.

सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेच्या प्रथम संलग्निकरणाच्या प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डॉ. एस. डी. नवले | (अध्यक्ष) |
| २) | प्रा. अमोल फाटक | (सदस्य) |
| ३) | मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | (सदस्य) |
| ४) | डॉ. पी. पी. तपकीरे | (सदस्य) |

उक्त समिती सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून, समितीने बी.टेक इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग १ या अभ्यासक्रमाची वाढीव प्रवेशक्षमता: ६० (६०+६०=१२०) च्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विना अट शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११०(२) अन्वये प्रथम संलग्निकरणास मान्यता देण्याची बाब प्रथमत: विद्यापरिषदेच्या बैठकीत सादर करणे आवश्यक आहे. तथापि, नजीकच्या काळात विद्यापरिषदेची बैठक नियोजित नसल्याने व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दि.३१/०८/२०२२ च्या पत्रान्वये सद्य:स्थितीत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु असल्याने सदर प्रवेश प्रक्रियेमार्फत वर नमूद अभ्यासक्रमाची शिफारस होवून विद्यार्थी वितरीत होणेकामी विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरणाचे पत्र दि.०३/०९/२०२२ रोजी ठीक ५:०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना सादर करणे आवश्यक असल्याचे कळविल्याने व विद्यार्थी हित विचारात घेता,

मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी.टेक इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग १ या अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेच्या (६०+६०=१२०) प्रथम संलग्निकरणास विद्यापरिषदेच्या वतीने तातडीची बाब म्हणून मान्यता दिलेली आहे.

सबब, वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील बी.टेक इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग १ या अभ्यासक्रमाची वाढीव प्रवेशक्षमता ६० (६०+६०=१२०) च्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनिमय, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील बी.टेक. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग १ या अभ्यासक्रमाची वाढीव प्रवेशक्षमता ६० (६०+६०=१२०) च्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनिमय, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली. |

**[ ०५ ] वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील बी. टेक कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाची वाढीव प्रवेशक्षमता ६० (१२०+६०=१८०) च्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

टिपणी: वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी.टेक कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेचा (१२०+६०=१८०) प्रस्ताव विलंब शुल्कासह सादर केला असून, त्यास ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांचे पत्र क्र. Western/१-१०९७५८७०००३/२०२२/EOA, दि.०३/०७/२०२२ व महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. मान्यता-२०२२/प्र.क्र.१४७/तांशि-४, दि.१८/०८/२०२२ अन्वये मान्यता मिळाली आहे.

सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेच्या प्रथम संलग्निकरणाच्या प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१) प्राचार्य डॉ. एस. डी. नवले (अध्यक्ष)
२) प्रा. अमोल फाटक (सदस्य)
३) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई (सदस्य)
४) डॉ. पी. पी. तपकीरे (सदस्य)

उक्त समिती सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून, समितीने बी.टेक कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाची वाढीव प्रवेशक्षमता ६० (१२०+६०=१८०) च्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विना अट शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११०(२) अन्वये प्रथम संलग्निकरणास मान्यता देण्याची बाब प्रथमत: विद्यापरिषदेच्या बैठकीत सादर करणे आवश्यक आहे. तथापि, नजीकच्या काळात विद्यापरिषदेची बैठक नियोजित नसल्याने व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दि.३१/०८/२०२२ च्या पत्रान्वये सद्य:स्थितीत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु असल्याने सदर प्रवेश प्रक्रियेमार्फत वर नमूद अभ्यासक्रमाची शिफारस होवून विद्यार्थी वितरीत होणेकामी विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरणाचे पत्र दि.०३/०९/२०२२ रोजी ठीक ५:०० वा. पर्यंत ऑनलाईन पध्दतीने तंत्रशिक्षण संचालनालय,

मुंबई सादर करणे आवश्यक असल्याचे कळविल्याने व विद्यार्थी हित विचारात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी.टेक कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेच्या (१२०+६०=१८०) प्रथम संलग्निकरणास विद्यापरिषदेच्या वतीने तातडीची बाब म्हणून मान्यता दिलेली आहे.

सबब, वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील बी.टेक कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाची वाढीव प्रवेशक्षमता ६० (१२०+६०=१८०) च्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनिमय, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील बी. टेक कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाची वाढीव प्रवेशक्षमता ६० (१२०+६०=१८०) च्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली. |

[ ०६ ] **प्रिं. के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट करिअर डेव्हलपमेंट अॅन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून एम. बी. ए. भाग १ व २ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणास तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.**

टिपणी: प्रिं. के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट करिअर डेव्हलपमेंट अॅन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून एम. बी. ए. भाग १ व २ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणाबाबत प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डॉ. एस. के. पाटील | (अध्यक्ष) |
| २) | डॉ. एस. बी. भांजे | (सदस्य) |
| ३) | मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे | (सदस्य) |
| ४) | श्री. पी. पी. तपकीरे | (सदस्य) |

उक्त समिती सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून समितीने एम. बी. ए. या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षासाठी अटीपूर्ततेच्या अधिन राहून शिफारस केलेली आहे.

स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटीपूर्तता करण्याबाबत महाविद्यालयास पत्रान्वये कळविले होते, त्याअनुषंगाने महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या अटीपूर्तता अहवाल सोबत जोडला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० मधील तरतूदीनुसार संलग्निकरणाच्या नुतनीकरणास प्रथमत: विद्यापरिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि, विद्यार्थी हित विचारात घेता व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर संलग्नता असल्याचे पत्र दि.२३/०७/२०२२ पर्यंत उपलब्ध करुन द्यावयाचे असल्याने तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा.कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात २०२२-२३ पासून एम. बी. ए. भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षाकरिता विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

सबब, प्रिं. के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट करिअर डेव्हल्पमेंट अॅन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून एम. बी. ए. भाग १ व २ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षाकरिता तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये विद्यापरिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेली मान्यता माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **प्रिं. के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट करिअर डेव्हलपमेंट अॅन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाच्या एम. बी. ए. भाग १ व २ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षाकरिता तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |

[ ०७ ] **विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावरील एम. एस्सी (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ या नवीन अभ्यासपाठयक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.**

टिपणी: विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाकडून कायम विना अनुदानित तत्वावर एम. एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ हा नवीन अभ्यासपाठयक्रम सुरु करणेबाबतच्या प्राप्त प्रस्तावास महाराष्ट्र शासन आदेश क्र. उच्च व तंत्र शिक्षण विभाग एनजीसी २०२२/(११६)/२२/मशि-४ दि. ०८/०८/२०२२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर मान्यता मिळाली असून सदर नवीन अभ्यासपाठयक्रमाच्या प्रथम संलग्निकरणाकरिता मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.) सोलापूर विभाग, सोलापूर यांचे प्रमाणपत्र विद्यापीठाकडे सादर केलेले आहे.

यास्तव उक्त मान्यतेस अनुसरुन सदर महाविद्यालयाच्या एम. एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ या नवीन अभ्यासपाठयक्रमास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण देण्याबाबत महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व विद्यापीठ अनुदान आयोग नियमावली, २००९ नुसार खालील प्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१) डॉ. श्रीमती ए. एस. लावंड (अध्यक्षा)
२) डॉ. एस. वाय. जाधव (सदस्य)
३) प्रा. एस. सी. देशमुख (सदस्य)

उक्त समितीने सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून समितीने उक्त महाविद्यालयाच्या एम. एस्सी (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ या नवीन अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षाकरिता खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्याची शिफारस केली आहे.

१) अध्यापनासाठी अधिकच्या दोन शिक्षकांची सोय करावी.
२) रसायनशास्त्रातील विविध संदर्भ पुस्तके व संशोधन नयतकालिके/पत्रिका यांच्या खरेदीसाठी रु ५०,०००/- ची तरतूद करावी.
३) M.Sc. - I (Chemistry) प्रथम वर्षासाठी लागणारे Chemical व Glassware खरेदीसाठी रु. ५०,०००/- ची तरतूद करावी.

४ प्रयोगशाळेच्या बाहेरच्या बाजूला कडाप्पा टेबल तयार करुन घेणे.

५) कमीत कमी ५ Computer with Internet Facility ची सोय करावी.

सदर अहवालातील अटींची पूर्तता करणेबाबत उपरोक्त महाविद्यालयास कळविण्यात आले होते त्याअनुषंगाने सदर महाविद्यालयाने अटीपूर्तता अहवाल सादर केलेला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार प्रथम संलग्निकरणास मान्यता देण्याची बाब प्रथमत: विद्या परिषद बैठकीत सादर करणे आवश्यक आहे. तथापि, विद्यापरिषदेची बैठक नियोजित नसल्याने एम. एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) अभ्यासपाठयक्रमाची प्रवेश प्रकिया विद्यापीठ स्तरावरील Spot Admission ची अंतीम मुदत दिनांक १३/०९/२०२२ रोजी असल्याने ही तातडीची बाब विचारात घेता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात कायम विना अनुदान तत्वावरील एम. एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग १ या नवीन अभ्यासपाठयक्रमास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षाकरिता खालील अटींच्या अधिन राहून विद्या परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

१) अध्यापनासाठी अधिकच्या दोन शिक्षकांची सोय करावी.

२) M.Sc. I (Chemistry) प्रथम वर्षासाठी लागणारे Chemical व Glassware खरेदीसाठी रु. ५०,०००/- ची तरतूद करावी.

सबब, विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावरील एम. एस्सी (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ या नवीन अभ्यासपाठयक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील एम. एस्सी (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ या नवीन अभ्यासपाठयक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाकरिता अटी पूर्ततेच्या अधिन राहून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**[ ०८ ] प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांकडून बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.ए.एल.एल.बी. आणि एल.एल.बी. तसेच बी.ए. (Civil Services), बी.कॉम. (Marketing) आणि बी.कॉम. (उद्योजकता) या अभ्यासक्रमांच्या मंजूर विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या प्रमाणात वार्षिक संलग्निकरण शुल्क घेण्यास तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

टिपणी: कोव्हीड २०१९ च्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षाच्या सत्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखेत बदल झाल्यामुळे व विद्यार्थ्यांच्या परीक्षा सद्यस्थितीत सुरु असल्यामुळे प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेल्या नाहीत. यामुळे प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयास दरवर्षीप्रमाणे दिनांक ३१ जुलै पूर्वी वार्षिक संलग्निकरण शुल्क विद्यापीठाकडे जमा करावे लागते. यापूर्वी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालयांकडून (पदवी) या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वार्षिक संलग्निकरण शुल्क आकारण्यात येत होते. परंतू, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षाच्या सत्रारंभ व सत्रसमाप्तीच्या तारखांमध्ये बदल झाल्यामुळे तसेच द्वितीय वर्ष व तृतीय वर्षाच्या परीक्षा झालेल्या नसल्यामुळे विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया झालेली नाही. तसेच दिनांक ३१/०७/२०२२ ही वार्षिक संलग्निकरण शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख असल्यामुळे, सदरील बाब ही तातडीची असल्याने व प्राधिकरणाच्या बैठका नियोजित नसल्यामुळे मा. कुलगुरु महोदयांनी दिनांक ३०/०७/२०२२ रोजीच्या टिपणीन्वये विविध प्राधिकरणाच्या वतीने तातडीची बाब म्हणून बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बी. ए. एल. एल. बी. आणि एल. एल. बी. तसेच बी. ए. (Civil Services), बी. कॉम. (Marketing) आणि बी. कॉम. (उद्योजकता) या अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रमाणात आकारण्याऐवजी मंजूर विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या प्रमाणात घेण्याचे आदेश प्राप्त झाले होते. त्यानुसार सुधारित परिपत्रकान्वये प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांना सदरील बाब कळविण्यात आलेली आहे.

सदरील विषय दिनांक २३/०८/२०२२ रोजीच्या प्रशासकीय मान्य टिपणी अन्वये आगामी होणाऱ्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीसमोर माहितीस्तव सादर करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक २६/०९/२०२२ रोजीच्या प्रशासकीय मान्य टिपणीन्वये सदरील विषय आगामी होणाऱ्या शुल्क निश्चिती समितीच्या समोर माहितीस्तव सादर करण्यात आलेला आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांकडून बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.ए.एल.एल.बी. आणि एल.एल.बी. तसेच बी.ए. (Civil Services), बी.कॉम. (Marketing) आणि बी.कॉम. (उद्योजकता) या अभ्यासक्रमांच्या मंजूर विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या प्रमाणात वार्षिक संलग्निकरण शुल्क घेण्यास तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| अ. क्र. | विद्याशाखा / अभ्यासक्रम | तपशील | वार्षिक संलग्निकरण शुल्क |
|---|---|---|---|
| १ | कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालय (पदवी) | महाविद्यालय स्थापनेच्या प्रथम वर्षी | ५,०००/- |
| | | नंतरच्या प्रत्येक वर्षात खालीलप्रमाणे | |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या ५०० अथवा कमी | १,०००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या ५०१ ते १००० | १,५००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या १००१ ते १५०० | २,५००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या १५०० पेक्षा अधिक | ३,५००/- |
| २ | बी. ए. (Civil Services) | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या ५०० अथवा कमी | १,०००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या ५०१ ते १००० | १,५००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या १००१ ते १५०० | २,५००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या १५०० पेक्षा अधिक | ३,५००/- |
| ३ | बी. कॉम. (Marketing) | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या ५०० अथवा कमी | १,०००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या ५०१ ते १००० | १,५००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या १००१ ते १५०० | २,५००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या १५०० पेक्षा अधिक | ३,५००/- |
| ४ | बी. कॉम. (उद्योजकता) | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या ५०० अथवा कमी | १,०००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या ५०१ ते १००० | १,५००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या १००१ ते १५०० | २,५००/- |
| | | मंजूर प्रवेश क्षमतेची विद्यार्थी संख्या १५०० पेक्षा अधिक | ३,५००/- |

| | |
|---|---|
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांकडून बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.ए.एल.एल.बी. आणि एल.एल.बी. तसेच बी.ए. (Civil Services), बी.कॉम. (Marketing) आणि बी.कॉम. (उद्योजकता) या अभ्यासक्रमांच्या मंजूर विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या प्रमाणात वार्षिक संलग्निकरण शुल्क घेण्यास तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची नोंद घेण्यात आली. |

[ ०९ ] **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयास मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थी प्रवेश क्षमतेस मान्यता देण्यास आकारण्यात येणाऱ्या शुल्कास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) नुसार तातडीची बाब म्हणून विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदय यांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

टिपणी: प्रस्तूत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी मूळ प्रवेश जादा विद्यार्थी प्रवेश संख्या वाढवून मिळावी, असे विनंती पत्र महाविद्यालयाकडून प्राप्त झाले होते. सदर प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता जादा विद्यार्थी वाढीव प्रवेशासंदर्भात उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी दिनांक २०/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा मार्च/एप्रिल २०२२ चा निकाल ८ जून २०२२ रोजी लागला असल्याचा उल्लेख करुन पारंपारिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया ही विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर सुरु झालेली असल्याचे उल्लेख करुन विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत आपल्या स्तरावर योग्य ते नियोजन करण्यात यावे व उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही. याची दक्षता घेणेबाबत कळविले आहे. त्यास अनुसरुन प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्येस मान्यता देण्याकरीता मा.कुलगुरु महोदय यांची मान्यता घेण्यात आलेली आहे. वाढीव विद्यार्थी संख्येस मान्यता देण्याकरीता मा.कुलगुरु महोदय यांची मान्यता घेण्यात आलेली आहे. वाढीव संख्येस महाविद्यालयाच्या मागणीनुसार १०%, २०%, ३०% व ४०% मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त बाबीस अनुसरुन वाढीव प्रवेश क्षमता मंजूर करण्यासाठी आकारावयाच्या शुल्काबाबत नियमावली नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०१ मधील तरतूदीनुसार सदरचे शुल्क अधिष्ठाता मंडळ, शुल्क समिती व विद्या परिषदेच्या मान्यतेअंती निश्चित करता येईल. परंतू वाढीव विद्यार्थी प्रवेश प्रलंबित असल्याने तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा.कुलगुरु महोदयांनी विविध प्राधिकरणाच्या वतीने शुल्क निश्चित करण्यास मान्यता दिलेली असून ती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जादा विद्यार्थी वाढ संख्या - टक्के | टक्क्यानुसार आकारण्यात येणारे सध्याचे शुल्क | मा.कुलगुरु महोदयांनी विविध प्राधिकरणाच्या वतीने निश्चित केलेले शुल्क |
|---|---|---|---|
| १) | १०% | १०००/- | १५००/- |
| २) | २०% | २०००/- | २५००/- |
| ३) | ३०% | ३०००/- | ३५००/- |
| ४) | ४०% | ४०००/- | ५०००/- |

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयास मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थी प्रवेश क्षमतेस मान्यता देण्यास आकारण्यात येणाऱ्या शुल्कास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) मधील तरतूदीनुसार तातडीची बाब म्हणून विविध प्राधिकरणाच्यावतीने मा. कुलगुरुमहोदय यांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव दिनांक २५/०७/२०२२ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत सादर केले असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयास मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थी प्रवेश क्षमतेस मान्यता देण्यास आकारण्यात येणाऱ्या शुल्कास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२(७) नुसार तातडीची बाब म्हणून विविध प्राधिकरणाच्यावतीने मा.कुलगुरु महोदय यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयास मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थी प्रवेश क्षमतेस मान्यता देण्यास आकारण्यात येणाऱ्या शुल्कास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) नुसार तातडीची बाब म्हणून विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदय यांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयास मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थी प्रवेश क्षमतेस मान्यता देण्यास आकारण्यात येणाऱ्या शुल्कास तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) नुसार मा. कुलगुरुमहोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**[ १० ] श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावरील एम. एस्सी (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ या नवीन अभ्यासपाठयक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.**

टिपणी : श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयाकडून कायम विना अनुदानित तत्वावर एम. एस्सी (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ हा नवीन अभ्यासपाठयक्रम सुरु करणेबाबतच्या प्राप्त प्रस्तावास महाराष्ट्र शासन आदेश क्र. उच्च व तंत्र शिक्षण विभाग एनजीसी २०२२/(११६)/२२/मशि-४ दि. ०८/०८/२०२२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावर मान्यता मिळाली असून सदर नवीन अभ्यासपाठयक्रमाच्या प्रथम संलग्निकरणाकरिता मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.) सोलापूर विभाग, सोलापूर यांचे प्रमाणपत्र विद्यापीठाकडे सादर केलेले आहे.

यास्तव, उक्त मान्यतेस अनुसरुन सदर महाविद्यालयाच्या एम. एस्सी (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ या नवीन अभ्यासपाठयक्रमास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण देण्याबाबत महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व विद्यापीठ अनुदान आयोग नियमावली, २००९ नुसार खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१) प्राचार्य डॉ. एम. टी. बचुटे - (अध्यक्ष)

२) डॉ. एस. आर. पुजारी - (सदस्य)

३) श्री. वाय. पी. पवार - (सदस्य)

उक्त समितीने सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून समितीने उक्त महाविद्यालयाच्या एम. एस्सी (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ या नवीन अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षाकरिता खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्याची शिफारस केली आहे.

१) ऑरगॅनिक केमिस्ट्री प्रॅक्टीकलसाठी इथर सेपरेशन रुम स्वंतत्र असणे आवश्यक आहे. इथर लगेच पेट घेत असल्याने अशी रुम आवश्यक आहे.

२) गॅस सिलिंडर्स ठेवण्याची व्यवस्था प्रयोगशाळेपासून बाहेरच्या बाजूला करावी. सुरक्षेच्या दृष्टीने गॅस सिलिंडर्स बाहेर असावीत.

३) विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट कामासाठी संगणक, व प्रिंटर खरेदी करावीत.

सदर अहवालातील अटींची पूर्तता करणेबाबत उपरोक्त महाविद्यालयास कळविण्यात आले होते त्याअनुषंगाने सदर महाविद्यालयाने अटीपूर्तता अहवाल सादर केलेला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार प्रथम संलग्निकरणास मान्यता देण्याची बाब प्रथमत: विद्यापरिषद बैठकीत सादर करणे आवश्यक आहे. तथापि, विद्यापरिषदेची बैठक नियोजित नसल्याने एम. एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) अभ्यासपाठयक्रमाची प्रवेश प्रकिया विद्यापीठ स्तरावरील Spot Admission ची अंतीम मुदत दिनांक १३/०९/२०२२ रोजी असल्याने ही तातडीची बाब विचारात घेता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात कायम विना अनुदान तत्वावरील एम. एस्सी (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ या नवीन अभ्यासपाठयक्रमास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षाकरिता खालील अटींच्या अधिन राहून विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

१) विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट कामासाठी संगणक व प्रिंटर खरेदी करावीत.

सबब, श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदानित तत्वावरील एम. एस्सी (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग १ या नवीन अभ्यासपाठयक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील एम. एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) भाग - १ या नवीन अभ्यासपाठयक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |

**[ ११ ] दि. २७/०६/२०२२ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.७२ दुरुस्त करुन घेण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयाचा संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव दि. २७/०६/२०२२ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. सदर बैठकीत पुढीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

| |
|---|
| शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील पीएच.डी. अर्थशास्त्र संशोधन केंद्राच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

परंतु, स्थानिक चौकशी समितीने पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे. सदर महाविद्यालयात सद्य:स्थितीत अर्थशास्त्र या विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध नसल्यामुळे संशोधन केंद्रास नवीन विद्यार्थी प्रवेशित करु नयेत. याबरोबरच जे इतर ५ विद्यार्थी या संशोधन केंद्रात संशोधन करत आहेत, त्यांचे शोध प्रबंध विद्यापीठाकडे सादर करेपर्यंत संलग्निकरणाचे नुतनीकरण देण्यात यावे अशी शिफारस समितीने केली आहे.

स्थानिक चौकशी समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने उक्त ठरावात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करुन घेणे आवश्यक आहे.

| |
|---|
| शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयाच्या पीएच.डी. अर्थशास्त्र संशोधन केंद्राच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध नसल्यामुळे जे ५ विद्यार्थी सद्य:स्थितीत संशोधन करत आहेत त्यांचे संशोधन कार्य पूर्ण होईपर्यंत संलग्निकरणाच्या नुतनीकरणास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

सबब, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयाचा पीएच.डी. अर्थशास्त्र या अभ्यासक्रमाचा संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचा ठराव क्र. ७२ दुरुस्त करणेची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **दि. २७/०६/२०२२ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.७२ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.**<br>**शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील पीएच.डी. अर्थशास्त्र या संशोधन केंद्राच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांकरिता किंवा सद्य:स्थितीत संशोधन कार्य करीत असलेल्या विद्यार्थ्यांचे संशोधन पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

[ १२ ] **कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर या महाविद्यालयाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील पीएच.डी. मराठी संशोधन केंद्राच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणाची मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून संलग्निकरणाच्या नुतनीकरणासाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे.

संलग्निकरणाचे नुतनीकरण - पीएच.डी. मराठी संशोधन केंद्र

त्याअनुषंगाने प्रस्तुत प्रस्तावास सन २०२२-२३ पासून संलग्निकरणाचे नुतनीकरण देण्यासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१) प्राचार्य डॉ. डी. एस. तिकटे (अध्यक्ष)

२) डॉ. राजेंद्र खंदारे (सदस्य)

३) डॉ. सचिन देशमुख (सदस्य)

उक्त समितीने कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर या महाविद्यालयास भेट देऊन अहवाल विद्यापीठाकडे सादर केला आहे. पीएच.डी. मराठी संशोधन केंद्रास समितीने विनाअट सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५, २०२५-२६ व २०२६-२७ या ५ वर्षांसाठी संलग्निकरणाच्या नुतनीकरणाची शिफारस केली आहे.

सबब, उक्त महाविद्यालयाच्या पीएच.डी. मराठी संशोधन केंद्राच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२६-२७ या ५ वर्षांकरीता मान्यता देण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर या महाविद्यालयाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील पीएच.डी. मराठी या संशोधन केंद्राच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२६-२७ या पाच वर्षांकरीता सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

[ १३ ] **दि. २७/०६/२०२२ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ७३ दुरुस्त करुन घेण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रूप या महाविद्यालयाचा संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव दि. २७/०६/२०२२ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. सदर बैठकीत पुढीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

| |
|---|
| संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रूप या महाविद्यालयाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील पीएच.डी. अर्थशास्त्र संशोधन केंद्राच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

परंतु, स्थानिक चौकशी समितीने पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे. सदर महाविद्यालयात सद्य:स्थितीत प्रवेशित ५ विद्यार्थ्यांचे संशोधन कार्य पूर्ण होईपर्यंत संलग्निकरणाच्या नुतनीकरणास सदर समितीने मान्यता दिली आहे. नंतर आपोआप संलग्निकरणाचे नुतनीकरण समाप्त होईल, अशी शिफारस समितीने केली आहे.

स्थानिक चौकशी समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने उक्त ठरावात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करुन घेणे आवश्यक आहे.

| |
|---|
| संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रूप या महाविद्यालयाच्या पीएच.डी. अर्थशास्त्र संशोधन केंद्राच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास सद्य:स्थितीत प्रवेशित ५ विद्यार्थ्यांचे संशोधन कार्य पूर्ण होईपर्यंत संलग्निकरणाच्या नुतनीकरणास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

सबब, संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रूप या महाविद्यालयाचा पीएच.डी. अर्थशास्त्र या अभ्यासक्रमाचा संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचा ठराव क्र. ७३ दुरुस्त करणेची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **दि. २७/०६/२०२२ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.७३ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.**<br>**संतोष भिमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप या महाविद्यालयाच्या कायम विना अनुदानित तत्वावरील पीएच.डी. अर्थशास्त्र या संशोधन केंद्राच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांकरिता किंवा सद्य:स्थितीत संशोधन कार्य करित असलेल्या विद्यार्थ्यांचे संशोधन पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**[ १४ ] वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणास मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणाबाबत प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डॉ. एस. डी. नवले | (अध्यक्ष) |
| २) | डॉ. एस. बी. भांजे | (सदस्य) |
| ३) | मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे | (सदस्य) |
| ४) | श्री. पी. व्ही. धनशेट्टी | (सदस्य) |

उक्त समिती सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देऊन अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला असून, समितीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांकरीता शिफारस केलेली आहे.

स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटीपूर्तता करण्याबाबत महाविद्यालयास पत्रान्वये कळविले होते, त्याअनुषंगाने महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला अटीपूर्तता अहवाल सोबत जोडला आहे.

सबब, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांकरीता मान्यता देण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाच्या बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांकरीता सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

[ १५ ] **सोलापूर सोशल असोसिएशनचे आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून एम. ए. (उर्दु) भाग १ व २ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणास मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: सोलापूर सोशल असोसिएशनचे आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर या महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून एम. ए. (उर्दु) भाग १ व २ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणाबाबत प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डॉ. डी. एस. तिकटे | (अध्यक्ष) |
| २) | श्रीमती फरझाना खनम एमडी हुसैन शेख | (सदस्या) |
| ३) | मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे | (सदस्य) |
| ४) | श्री. एस. सी. देशमुख | (सदस्य) |

उक्त समिती सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला असून, समितीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून एम. ए. (उर्दु) भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या तीन वर्षांकरीता शिफारस केलेली आहे.

स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटीपूर्तता करण्याबाबत महाविद्यालयास पत्रान्वये कळविले होते, त्याअनुषंगाने महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला अटीपूर्तता अहवाल सोबत जोडला आहे.

सबब, सोलापूर सोशल असोसिएशनचे आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून एम. ए. (उर्दु) भाग १ व २ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या तीन वर्षांकरिता मान्यता देण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **सोलापूर सोशल असोसिएशनचे आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर या महाविद्यालयाच्या एम. ए. (उर्दु) भाग १ व २ या अभ्यासक्रमाचे संलग्निकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या तीन वर्षांकरिता सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

